पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाणनगर पाषाण रोड, पुणे -४११००८
दुरध्वनी क्रमांक-०२०-२५६५७८७८ फॅक्स क्रमांक-०२०-२५६७४६४१
ई मेल- sp.pune.r @mahapolice.gov.in.
(आस्थापना शाखा)

जा.क्रं.पोअ/आशा-१ प्रति/पोभ-२२-२३ /ता.निवड-प्रतिक्षा यादी/२०२४/ पुणे दिनांक:- २७/१२/२०२४.

# पुणे ग्रामीण चालक पोलीस शिपाई भरती २०२२-२३ कागदपत्र पडताळणीचे अधिन राहुन तात्पुरती अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी.

## ( उमेदवारांकरीता सुचना )

*******

- पुणे ग्रामीण आस्थापनेवरील सन २०२२-२३ मध्ये रिक्त असलेल्या ४८ चालक पोलीस शिपाई पदासाठी घेण्यात आलेल्या मैदानी चाचणी व लेखी परिक्षेमध्ये जे उमेदवार विहीत गुणांनी उत्तीर्ण झाले असून, सामाजिक व समांतर आरक्षणाच्या आधारे पात्र ठरले आहे, अशा उमेदवारांची कागदपत्र पडताळणीचे अधीन राहुन तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षायादी ही मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे व भरती निकषांची पुर्तता यांच्या अधीन राहून आणि सा.प्र.विभाग, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्रक्र ३१/९८/१६-अ, दि. १६/०३/१९९९ शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-१११८/प्रक्र.३९/१६-अ, दि.१९/१२/२०१८, शासन निर्णय क्र पोलीस-१८१९/प्र.क्र.३१६/पोल-५अ, दि.१०/१२/२०२० व महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम २०१९ मधील तरतुदीनुसार यासोबत संलग्न करून कार्यालयाचे संकेतस्थळ https://puneruralpolice.gov.in तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे https://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ३०/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.
- तात्पुरत्या प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांची मुळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांची विहीत शासन निर्णय, परिपत्रके, जाहिरात व पोलीस भरती कार्यपध्दती मधील निर्देशानुसार फेरपडताळणी करण्यासाठी सोबत जोडलेल्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी खालील प्रमाणे कागदपत्रे आणावी.

१. ६ पासपोर्ट साईज फोटो,

२. सध्या चालू असलेले राष्ट्रीयकृत बँक खातेच्या पासबुक प्रती व कॅन्सल चेक त्याच बँक खाते क्रमांकाचे तीन प्रती

३. आधार कार्ड व पॅनकार्ड छायांकित प्रती प्रत्येकी तीन प्रति मध्ये घेवून याव्यात.

४. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र.

५. जन्म तारखेबावत प्रमाणपत्र (जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला / बोनाफाईड)

६. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र, इमाव, एसईबीसी या समाजिक प्रवर्गातून अर्ज भरला असल्यास त्याबाबतचे जात प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमिलेअर (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळून) तसेच आर्थिककृष्टया दुर्बल घटक प्रवर्गातून आवेदन अर्ज सादर केला असल्यास ईडब्ल्युएस प्रमाणपत्र.

७. अधिवास प्रमाणपत्र (Domicile)

Scanned with OKEN Scanner
CamScanner

८. आवेदन अर्जात नमूद केलेले समांतर आरक्षणाबाबतचे (गृहरक्षक/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/अंशकालीन पदवीधर/ पोलीस पाल्य/ अनाथ/ खेळाडू/ माजी सैनिक/ युध्दात अपंग झालेल्या किंवा मृत झालेल्या सैन्यातील व्यक्तीचे कुटुंबीय ) प्रमाणपत्र/ कागदपत्र तसेच महिला समांतर आरक्षणाअंतर्गत निवड झालेल्या महिला उमेदवारांनी मागासवर्गीय असल्यास (खुला, अनुसूचित जाती व जमाती वगळून) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र.

९. संगणक अर्हता प्रमाणपत्र

१०. हलके वाहन चालविण्याचा (LMV) किंवा (LMV-TR) वैध परवाना.

वरिल नमूद व भरती संदर्भातील सर्व मुळ कागदपत्रांसह व सदर कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीच्या दोन संचासह दि.३०/१२/२०२४ रोजी सकाळी १०:०० वा. पोलीस मुख्यालय, पुणे ग्रामीण येथे न चुकता हजर रहावे. कागदपत्र पडताळणीत उमेदवार गैरहजर राहील्यास त्यांचे नाव तात्पुरत्या अंतिम प्रतिक्षा यादीतून वगळण्यात येईल.

- तात्पुरत्या अंतिम प्रतिक्षा यादीमधील निवड ही भरती प्रक्रियेशी निगडीत निकषांचे पुर्ततेच्या अधीन असून पुनं:पडताळणी अंती एखादा उमेदवार अपात्र झाल्यास त्या-त्या प्रवर्गाच्या निवड यादीमधील नाव रद्द करण्यात येवून त्यांना भरती प्रक्रीयेतुन / प्रतिक्षा यादीतून बाद करण्यात येईल त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा, तक्रार अगर हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.
- तात्पुरत्या अंतिम प्रतिक्षासूचीतील त्या-त्या यादीतील निवड झालेले सामाजिक / समांतर आरक्षणातील उमेदवार पुढील टप्प्यावर अगर इतर कारणास्तव अपात्र झाल्यास किंवा उपलब्ध न झाल्यास त्या-त्या प्रवर्गाच्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधून वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील.
- भरती प्रक्रीये दरम्यान आवश्यक ते बदल / निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

२७/१२/२०२४

( भागवत हिशोवे )
कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे करिता

Scanned with OKEN Scanner
CamScanner

| Sr | Chest No | M/F | Name | Birth Date | Category | Parallel Reservation | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1841 | M | ABHISHEK BALU JADHAV | 31-03-2002 | SEBC | None | OPEN General/SEBC General |
| 2 | 1409 | M | RUSHIKESH SURESH ABHANG | 24-12-2002 | SC | None | SC General |
| 3 | 1323 | M | PRAVIN MAROTI WANJARE | 18-03-1995 | ST | None | ST General |
| 4 | 1233 | M | BALASO BAPURAO KARANDE | 14-09-1996 | OBC | None | OBC General |

Scanned with OKEN Scanner
CamScanner